क्र.मासं/रवका/न.क्र.२८३/
**महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.**
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई - ४०० ०१९.
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

**महावितरण**
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.

दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

## प्रशासकीय परिपत्रक क्र. ५१८ दिनांक ०३ / १० / २०१५

विषय : सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४ अनुसार 'सफाई कामगार' या पदांकरिता उच्च वेतनश्रेणीचा तृतीय लाभ विहित करण्याबाबत.

.....

सा.आ.क्र.७४ (क) दिनांक ३०.०४.१९७४ अन्वये कंपनीमध्ये कार्यरत अधिकारी/कर्मचाऱ्यांना त्यांच्या सेवा कालावधीत उच्च वेतन श्रेणीचे प्रथम व द्वितीय लाभ देण्याबाबतच्या तरतुदी करण्यात आल्या आहेत. तसेच प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दि.२८.०७.२०१० अनुसार ज्या कर्मचाऱ्यांची तदर्थ म.रा.वि.मंडळ व मंडळाच्या विभाजनानंतर महावितरण कंपनीमध्ये अखंडित २८ वर्षे सेवा पूर्ण झाली आहे अशा कर्मचाऱ्यांना विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून उच्च वेतनश्रेणीचा तृतीय लाभ मंजूर करण्याबाबतच्या सूचना प्रसारित करण्यात आलेल्या आहेत. तसेच कंपनीतील कार्यरत मनुष्यबळाचा आढावा घेतल्यानंतर सफाई कर्मचारी हे पद कंपनीच्या आस्थापनेवरून कमी करण्यात आले असून सदयस्थितीत त्या पदावर कर्मचारी कार्यरत आहेत. संबधीत सफाई कर्मचारी सेवानिवृत्त झाल्यांनंतर ही पदे रदद समजण्यात येतील तथापी सदर कर्मचा-यांना पात्रतेनुसार देय असल्यास उच्च वेतन श्रेणीच्या तृतीय लाभ देणे आवश्यक आहे.

२. या अनुषंगाने प्रशासकीय परिपत्रक क्र.३२० दि.२२.११.२०१० अन्वये 'सफाई कामगार' या पदांवर कार्यरत कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणीचा तृतीय लाभ देण्याकरिता वेतनश्रेणी विहित करण्यात आली आहे. सदर विहित करण्यात आलेल्या वेतनश्रेण्यांबाबत सखोल परिक्षण करून कंपनीमध्ये लागू करण्यात आलेल्या सुधारित कर्मचारी मानंकानुसार तसेच कंपनीत विविध पदांकरिता लागू करण्यात आलेल्या संवर्गनिहाय वेतनश्रेण्या विचारात घेऊन प्राप्त अधिकारानुसार संचालक (वित्त) यांनी संचालक (संचलन) व संचालक (प्रकल्प) यांच्याशी विचारविनिमय करुन 'सफाई कामगार' या पदाकरिता तृतीय लाभ देण्यासाठी विहित करण्यात आलेल्या वेतनश्रेण्या खालील प्रमाणे सुधारित करण्याकरिता मंजुरी प्रदान केली आहे.

| पदनाम<br>सफाई कामगार<br>मुळ वेतनश्रेणी | सा.आ.क्र.७४ (क) चा तृतीय लाभ देय असल्यास त्या संदर्भात प्रस्तावित सुधारित वेतनश्रेणी |
|---|---|
| रु.१००५०-१९५-११०२५-२३५-१३३७५-२७५-१९७००<br>(रू.८०४०-१५५-८८१५-१८५-१०६६५-२२०-१५७२५) | रु. ११९६५-४१०-१४०१५-४५०-१८५१५-४९०-३४११५<br>(रू.९५७०-३२५-१११९५-३६०-१४७९५-३९०-२७२७५) |

३. सर्व संबंधितांना विनंती करण्यात येते की 'सफाई कामगार' या पदावर कार्यरत कर्मचाऱ्यांना उच्च वेतनश्रेणीचा मंजूर करण्यात आलेला तृतीय लाभ हा उपरोक्त नमूद वेतनश्रेणीनुसार सुधारित करण्यात यावा व त्या अनुषंगाने वेतननिश्चिती करण्यात यावी.

४. सा.आ.क्र.७४ (क) दि.३०.०४.१९७४, प्रशासकीय परिपत्रक क्र.३०४ दिनांक २८.०७.२०१० व प्रशासकीय परिपत्रक ३२० दिनांक २२.११.२०१० मधील इतर तरतुदी अबाधित राहतील.

५. सदर प्रशासकीय परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(संदेश हाके)
**मुख्य महाव्यवस्थापक (मासं)**

*D:\O&M\Adm.Cir.F.N.283.3rd G.O.74.doc*